# पालिका-‘बेस्ट’चा अर्थसंकल्प आता एकत्र

## बेस्ट समितीचा एकमताने ठराव; पालिकेवरील ताण वाढणार

प्रतिनिधी, मुंबई

**डबघाईला आलेल्या** बेस्टला पालिकेने अर्थसाहाय्य करावे या मागणीसाठी बेस्टचा अर्थसंकल्प महापालिकेच्या अर्थसंकल्पात समाविष्ट करावा याबाबत सोमवारी पार पडलेल्या बेस्ट समितीत सर्व सदस्यांनी एकमताने मंजुरी देत बेस्ट अर्थसंकल्प पालिकेच्या अर्थसंकल्पात विलीन करण्यास ठराव मंजूर केला. त्यामुळे यापुढे बेस्टचा अर्थसंकल्प सर्वात जास्त बजेट असलेल्या मुंबई महापालिकेच्या अर्थसंकल्पात विलीन होणार आहे. बेस्टच्या इतिहासात हा महत्त्वपूर्ण निर्णय ठरेल.

मुंबईची दुसरी सर्वाधिक वापरली जाणारी वाहतूक सेवा असलेली बेस्ट सध्या आर्थिक संकटात सापडली आहे. कर्मचाऱ्यांचे पगारही वेळेवर न देण्याची नामुष्की बेस्ट प्रशासनावर ओढवली. त्यामुळे बेस्टने अनेक सेवा बंद केल्या. कर्मचाऱ्यांचे पगार वेळेत करावे, बेस्टचा अर्थसंकल्प पालिकेच्या अर्थसंकल्पात समाविष्ट करून पालिकेने बेस्टची जबाबदारी स्वीकारावी या मागणीसाठी बेस्ट कर्मचारी व बेस्ट संयुक्त कामगार कृती समितीने प्रथम उपोषण नंतर बेस्टच्या इतिहासात प्रथमच बेस्टदिनी संप पुकारला होता. त्यानंतर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी बेस्ट कर्मचाऱ्यांचे पगार वेळेवर होतील अशी ग्वाही दिली होती. त्यानंतर प्रथमच पार पडलेल्या बेस्ट समितीच्या सभेत सर्व बेस्ट सदस्यांनी एकमताने बेस्ट अर्थसंकल्प पालिकेच्या अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यास मंजुरी दिली.

मात्र बेस्ट समितीने संमत केलेला हा निर्णय महापालिका सभागृहात मंजुरीसाठी येईल आणि त्यानंतर नगरविकास खात्याकडे अंतिम मंजुरीसाठी पाठवण्यात येईल. बेस्ट अर्थसंकल्प महापालिका अर्थसंकल्पात विलीन करण्याचा अंतिम निर्णय झाला तर बेस्टच्या कामगिरीचा थेट परिणाम महापालिकेच्याच तिजोरीवर पडणार आहे.

### नवीन बस खरेदीचा प्रस्ताव नामंजूर



- टाटा मोटर्सकडून नवीन ३०३ बसेस खरेदी करण्याचा प्रस्ताव होता, मात्र पैशांच्या कमतरतेमुळे १८५ बसेस बेस्टने खरेदी करत उर्वरित ११८ बस खरेदी करण्यास नकार दिला. पालिकेने नवीन बस खरेदीसाठी १०० कोटींची तरतूद केली होती, त्यातील ९० कोटींमध्ये १८५ बस खरेदी करण्यात आल्या तर उर्वरित १० कोटीमधून ६ इलेक्ट्रीकल बस खरेदी करण्यात आल्या आहेत.
- लवकरच इलेक्ट्रीकल बस बेस्टच्या ताफ्यात दाखल होतील असे बेस्टचे महाव्यवस्थापक सुरेंद्र बागडे यांनी म्हटले. मात्र बेस्ट समितीत सर्व सदस्यांनी टाटाकडून रद्द केलेल्या ११८ बसही खरेदी करण्यात याव्यात या प्रस्तावाला बेस्ट महाव्यवस्थापक बागडे यांनी बेस्टकडे पैसे नसल्याचे सांगत नकार दिला.
- बेस्ट संयुक्त कामगार कृती समिती व बेस्ट कर्मचाऱ्यांनी पुकारलेला संप मागे घेण्यासाठी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी कर्मचाऱ्यांचे पगार वेळेत होतील असे आश्वासन दिले होते. त्यानंतर कर्मचाऱ्यांचे पगार १० तारखेला देण्यासाठी २५० कोटी रुपये कर्ज काढून देण्याची वेळ बेस्टवर आल्याचे बेस्ट समिती सदस्य सुनील घणाचार्य यांनी बेस्ट समितीतील सभेत अधोरेखित केले. तसेच बेस्ट ही प्रवाशांच्या कमतरतेमुळे आर्थिक तोटयात नसून बेस्ट प्रशासनाच्या भोंगळ कारभारामुळे आर्थिक अडचणीत आल्याचेही ते म्हणाले.

# मुंबईतील शिक्षकांचे पगार युनियन बँकेतूनच

## उच्च न्यायालयाचा अंतरिम आदेश

प्रतिनिधी, मुंबई

**मुंबईतील शिक्षकांचा** पगार कोणत्याही परिस्थितीत थांबवता येणार नाही. त्यामुळे पगार मुंबै बँकेतूनच देण्याचा राज्य सरकारने घेतलेला निर्णय वैध की अवैध हे नंतर ठरवता येईल. तो निर्णय होईपर्यंत शिक्षकांचे पगार युनियन बँकेतूनच दिले जावेत, असा अंतरिम आदेश सोमवारी उच्च न्यायालयाने दिला. त्यामुळे गेल्या १५ दिवसांपासून अडकलेल्या मुंबईतील १५ हजार शिक्षकांच्या पगाराचा मार्ग मोकळा झाला आहे. विशेष म्हणजे ठाणे जिल्ह्यातील शिक्षक, शिक्षकेतरांनाही या निर्णयाचा फायदा होणार असून त्यांचे पगारही ठाणे जिल्हा बँकेतून होणार आहेत.

मुंबईतील शिक्षकांचे पगार राष्ट्रीयीकृत युनियन बँकेऐवजी मुंबै जिल्हा बँकेतून देण्याचा निर्णय राज्य सरकारने ३ जून रोजी घेतला होता.



त्याविरोधात शिक्षक भारतीसह अन्य शिक्षक संघटनांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. राज्य सरकारच्या निर्णयाबाबत न्यायालयानेही सुरुवातीला नाराजी व्यक्त करीत शिक्षकांना पगाराविना ठेवता येऊ शकत नाही. त्यामुळे त्यांचे पगार तातडीने व्हावेत, असे सुनावले होते. त्यावर सरकारने भूमिका स्पष्ट करण्यासाठी वेळ मागून घेतला होता.

न्यायमूर्ती अनुप मोहता आणि न्यायमूर्ती भारती डांगरे यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणी सोमवारी सुनावणी झाली. त्या वेळी युनियन बँकेचे ‘पूल अकाऊंट शालार्थ प्रणालीत पुन्हा कार्यान्वित करण्यात आल्याचे राज्य सरकारतर्फे न्यायालयाला सांगण्यात आले. त्यानंतर सरकारचा निर्णय वैध की वैध हे नंतर ठरवले जाईल. तोपर्यंत शिक्षकांचे पगार युनियन बँकेतून दिले जावेत, असे अंतरिम आदेश न्यायालयाने दिले. तसेच प्रकरणाची पुढील सुनावणी ६ सप्टेंबर रोजी ठेवली आहे.

त्याआधी मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षकेतरांचे विरोध असूनही पगार खाते उघडण्यासाठी चालवलेली कार्यवाही बेकायदेशीर असल्याचे ‘शिक्षक भारती’च्या वतीने न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. कोणत्याही केवायसीशिवाय खाते उघडले गेल्याचे, काही शिक्षकांना रकमेपेक्षा जास्त पगार गेल्याचे, तर काहींचे धनादेश वटले नसल्याची बाबही न्यायालयाला सांगण्यात आली. त्यानंतर न्यायालयाने राज्य सरकारकडून उत्तर मागितले होते.

- राज्य सरकारने मान्य केल्यानुसार सोमवारपासूनच शालार्थ प्रणालीमध्ये युनियन बँकेचे मेन पुल अकाऊंट कार्यान्वित करण्यात आले आहे. १६ ऑगस्ट रोजी सकाळी ११.३० पर्यंत मुंबईतील शाळा व कनिष्ठ महाविद्यलयांनी आपले पगाराचे देयक संबंधित वेतन अधीक्षकांना सादर करावे. तसेच हे पगाराचे देयक पूर्वीप्रमाणे ऑनलाइन पाठवून द्यावे. या शिक्षक, शिक्षकेतरांचे पगार २४ ऑगस्टपूर्वी वितरित करण्याचे आश्वासनही सरकारने न्यायालयात दिले आहे, अशी माहिती ‘शिक्षक भारती’चे कार्याध्यक्ष सुभाष मोरे यांनी दिली.

# ‘चितळे बंधू मिठाईवाले’ उत्पादन केंद्रात कर्मचाऱ्यांचा संप

प्रतिनिधी, पुणे

**‘चितळे बंधू** मिठाईवाले’ यांच्या एका उत्पादन केंद्रामधील कर्मचारी संपावर गेल्यामुळे खवय्या पुणेकरांच्या मागणीनुसार खाद्यपदार्थांचा पुरवठा होत नसल्याचे स्पष्ट झाले आहे. सणावाराचा श्रावण महिना सुरू असताना चितळे यांच्या दुकानांतून नारळबर्फी, डिंक लाडू, रवा लाडू, स्पेशल मोतीचूर लाडू, आंबावडी, आलेपाक, स्पेशल चिवडा हे पदार्थ सध्या मिळत नाहीत. मात्र, दुकानाचे कामकाज हे पूर्णपणे सुरळीत सुरू असल्याचा दावा चितळे बंधू मिठाईवालेचे भागीदार श्रीकृष्ण चितळे यांनी केला आहे.

चितळे बंधू मिठाईवाले यांची शनिपार आणि डेक्कन जिमखाना अशी दोन दुकाने असून चितळे यांच्या उत्पादनांची विक्री करणारी शहरभरात १४ दुकाने आहेत. चितळे स्वीट्सची गुलटेकडी येथे दोन उत्पादन केंद्र आहेत. त्यापैकी एका उत्पादन केंद्रातील १२० कर्मचारी पगारवाढीच्या मागणीसाठी २० जुलैपासून संपावर आहेत. हे सर्व कर्मचारी राष्ट्रीय श्रमिक संघटनेशी संलग्न आहेत.

गुलटेकडी येथील एक उत्पादन केंद्र बंद असल्याने उर्वरित उत्पादन केंद्रावर अतिरिक्त भार आला आहे. या केंद्रात उत्पादित केले जाणारे खाद्यपदार्थ पुणेकरांची मागणी पूर्ण करू शकत नाहीत, असे चित्र आहे.

# काँग्रेस नेते पूर्णेकर यांची प्रकृती चिंताजनक

प्रतिनिधी, औरंगाबाद

**दिवंगत पंतप्रधान** इंदिरा गांधी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त औरंगाबादेत आयोजित कार्यक्रम आटोपून ठाण्याकडे परतत असताना गंगापूरजवळ ट्रॅव्हल्स व कारमध्ये रविवारी सायंकाळी झालेल्या भीषण अपघातात प्रदेश काँग्रेसचे सचिव ठार झाले. या अपघातात ठाणे जिल्हा काँग्रेसचे माजी अध्यक्ष बाळकृष्ण पूर्णेकर यांची प्रकृती अधिकच गंभीर बनली आहे. त्यांच्या डोक्याला गंभीर जखम झाली असून त्यांच्यावर येथील सिग्मा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पूर्णेकर यांच्या प्रकृतीत सोमवारीही काही सुधारणा झाली नव्हती.

सिग्मातील सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार पूर्णेकर यांची प्रकृती स्थिर आहे. त्यांचे ठाण्यातील कुटुंबीय सोमवारी पहाटे येथे दाखल झाले आहे. रविवारी गंगापूरजवळ झालेल्या अपघातात काँग्रेसचे प्रदेश सचिव संजय चौपाने हे जागीच ठार झाले होते. तर रमाकांत म्हात्रे हे व कारचालक जखमी झाले आहेत.


**THYROCARE TECHNOLOGIES LIMITED**

**Registered Office:** D/37-1, TTC Industrial Area, MIDC Turbhe, Navi Mumbai 400 703.
**Corporate Office:** D/37-3, TTC Industrial Area, MIDC Turbhe, Navi Mumbai 400 703.
**Tel:** (91 22) 2762 2762 | **Fax:** (91 22) 2768 2409 | **Website:** www.thyrocare.com
**Email:** ramjee.d@thyrocare.com | **Corporate Identity Number:** U85110MH2000PLC123882

Thyrocare® Think Thyroid. Think Thyrocare.

**Extract of Unaudited Consolidated/Standalone Financial Results for the Quarter ended 30 June, 2017**

(₹ in Millions)

| Sr. No. | Particulars | Consolidated | | Standalone | |
|---|---|---|---|---|---|
| | | Quarter Ended 30.06.2017 | Quarter Ended 30.06.2016 | Quarter Ended 30.06.2017 | Quarter Ended 30.06.2016 |
| 1 | Total Income from Operations | 877.56 | 687.45 | 821.39 | 682.66 |
| 2 | Net Profit for the period before tax (Before Exceptional and Extraordinary items) | 366.83 | 258.08 | 378.46 | 267.20 |
| 3 | Net Profit for the period before tax (After Exceptional and Extraordinary items) | 346.34 | 258.08 | 357.97 | 267.20 |
| 4 | Net Profit for the period after tax (After Exceptional and Extraordinary items) | 220.19 | 170.78 | 231.82 | 179.90 |
| 5 | Total Comprehensive Income for the period | 221.05 | 170.82 | 232.68 | 179.94 |
| 6 | Equity Share Capital (Face Value per Share: ₹ 10/- each) | 537.23 | 536.90 | 537.24 | 537.24 |
| 7 | Basic and Diluted Earnings Per Share (of ₹ 10/- each) (Not annualised) | | | | |
| | a. Basic : | 4.10 | 3.18 | 4.31 | 3.35 |
| | b. Diluted: | 4.09 | 3.18 | 4.31 | 3.35 |

**Notes.**

1. The above financial results of the Company were reviewed and recommended by the Audit Committee on 12th August 2017 and subsequently approved by the Board of Directors at its meeting held on 12th August 2017.
2. The above is an extract of the detailed format of Financial Results for the Quarter ended 30-06-2017 filed with the Stock Exchanges under Regulations 33 and 47 of the SEBI (Listing Obligations & Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly Stand-alone & Consolidated Financial Results are available on the Stock Exchange websites viz. www.nseindia.com and www.bseindia.com. The same is also available on the Company's website viz. www.thyrocare.com
3. The Company has adopted Indian Accounting Standard (Ind-AS) from 1st April 2017 and the financial results have been prepared in accordance with IND-AS prescribed under Section 133 of the Companies Act, 2013. The figures for the previous quarters have been restated to comply with IND-AS.

**Place :** Navi Mumbai
**Date :** 12th August, 2017

By Order of the Board
**For Thyrocare Technologies Limited**
Dr. A. Velumani
Managing Director
DIN: 00002804



mep INFRASTRUCTURE DEVELOPERS LTD.

**MEP INFRASTRUCTURE DEVELOPERS LIMITED**

**CIN: L45200MH2002PLC136779**
**Registered Office:** A-412, boomerang, Chandivali Farm Road, Near Chandivali Studio, Andheri (East), Mumbai 400 072. **Ph:** (91 22) 61204800; **Fax:** (91 22) 6120 4804; **Email:** investorrelations@mepinfra.com; **Website:** www.mepinfra.com









**EXTRACT OF CONSOLIDATED UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED 30th June 2017**

(Rs. In Lakhs, except per share data)

| Sr. No. | Particulars | Quarter Ended 30 June 2017 (Unaudited) | Quarter Ended 31 March 2017 (Unaudited) | Quarter Ended 30 June 2016 (Unaudited) | Year to date figures for the year Ended 31 March 2017 (Audited) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Total income from operations | 42,173.09 | 46,117.72 | 48,082.30 | 181,543.58 |
| 2 | Net profit/ (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | 1,632.93 | 1,490.15 | 12.36 | 1,405.66 |
| 3 | Net Profit/ (Loss) for the period before tax (after Exceptional and/ or Extraordinary Items) | 1,632.93 | 1,490.15 | 5,467.65 | 17,199.01 |
| 4 | Net Profit / (Loss) for the period after tax (after Excetional and / or Extraordinary items) | 1,296.54 | 1,204.25 | 3,351.92 | 10,892.50 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax) ] | 1,284.38 | 1,176.23 | 3,345.94 | 10,844.33 |
| 6 | Equity Share Capital | 16,256.92 | 16,256.92 | 16,256.92 | 16,256.92 |
| 7 | Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year | - | - | - | (17,048.44) |
| 8 | Earnings Per Share (of Rs. 10 /- each) (for continuing and discontinued operations) (not annualised for quarters) | | | | |
| | Basic : | 0.80 | 0.74 | 2.06 | 6.70 |
| | Diluted: | 0.80 | 0.74 | 2.06 | 6.70 |

**Note:**

1 The above is an extract of the detailed format of Unaudited Quarterly Financial Results for the quarter ended 30th June 2017 filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulation, 2015. The full format of the Unaudited Quarterly Financial Results including the modifyied opinion are available on the Stock Exchange web sites- www.bseindia.com and www.nseindia.com and on the Company's website - www.mepinfra.com.

2 The above Unaudited Quarterly Financial Results were reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors at their meeting held on 14th August 2017. The limited review of Unaudited Quarterly Financial Results for the Quarter ended 30th June 2017 has been carried out by the Statutory Auditors of the Company.

3 The Unaudited Quarterly Financial Results have been prepared in accordance with Indian Accounting Standards ( Ind AS) prescribed under Section 133 of the Companies Act, 2013 read with releavnt rules thereunder and in terms of Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulation, 2015.

4 **Key number of Standalone Unaudited Quarterly Financial Results**

(Rs. In Lakhs)

| Particulars | Quarter Ended 30 June 2017 (Unaudited) | Quarter Ended 31 March 2017 (Unaudited) | Quarter Ended 30 June 2016 (Unaudited) | Year to date figures for the year Ended 31 March 2017 (Audited) |
|---|---|---|---|---|
| Total income from operations | 19,106.12 | 23,054.52 | 19,739.68 | 81,000.00 |
| Profit / ( Loss ) before tax | 49.57 | 1,132.30 | 600.73 | 2,676.72 |
| Profit / ( Loss ) after tax before Other Comprehensive Income | 319.10 | 761.22 | 390.30 | 1,767.83 |
| Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 312.44 | 741.40 | 388.02 | 1,741.18 |

5 Previous quarter/year's figures have been regrouped/rearranged wherever necessary.

**Place : Mumbai**
**Date : 14th August, 2017**

**For and on behalf of Board of Directors of**
**MEP INFRASTRUCTURE DEVELOPERS LIMITED**
**Sd/-**
**Jayant D. Mhaiskar**
**Vice Chairman & Managing Director**
**DIN: 00716351**



50 YEARS Inspired by you

**MEGA FREEDOM OFFERS**

स्पेशल डील्स • सुपर सेविंग्स

वाशीच्या आमच्या प्रशस्त आणि परिपूर्ण शोरूममध्ये आपले स्वागत आहे
पाम बीच गॅलेरिया, पाम बीच रोड, सेक्टर 19 D, नवी मुंबई 400 703



कमी ईएमआय
भव्य एक्स्चेंज ऑफर्स
विस्तृत श्रेणी
झीरो डाउन पेमेंट*

ही संधी गमावू नका!

Extra 5% CASHBACK* SBI Debit Card | SBI Card
*Min. Trnx: ₹20,000; Max. Cashback: ₹2,000 per card account. Validity : 14 - 18 Aug '17. Offer also valid on EMI trxn with SBI Credit Card. T&C Apply.

vijay sales®

MUMBAI PUNE AHMEDABAD SURAT VADODARA DELHI GURGAON NOIDA INDIRAPURAM FARIDABAD

आमच्या शोरूममध्ये या :
• ऑपेरा हाऊस • प्रभादेवी • माहिम • खार (प.) • सांताक्रुझ (प.) • अंधेरी (प.) : देव प्लाझा, एस व्ही रोड • अंधेरी (प.) : इन्फिनिटी मॉल • गोरेगाव (प.) • गोरेगाव (पू.) • बोरीवली (प.) • मीरा रोड (पू.) • वसई (प.) • विरार (प) • घाटकोपर (प.) : तळ मजला, आर सिटी मॉल • सायन • चेंबुर • भांडूप (प) • ठाणे (प.) : टिप-टॉप प्लाझा • ठाणे (प.) : वंडर मॉलसमोर • डोंबिवली (पू.) • कल्याण (प.) • कल्याण (पू.) • भिवंडी • खारघर • बेलापुर • पनवेल

कॉर्पोरेट आणि बल्क चौकशीसाठी येथे ई-मेल करा : corporate@vijaysales.com • SERVICE CALLS: (022) 6622 7722 | www.vijaysales.com

सरळ फायनान्स ऑप्शन्स CAPITAL FIRST | BAJAJ FINSERV

*अटी लागू. ऑफर मुंबई, नवी मुंबई, मीरा रोड, ठाणे आणि पनवेल येथे उपलब्ध. अधिक माहितीसाठी जवळच्या शोरूमला भेट द्या. दर्शविलेल्या प्रतिमा काल्पनिक आहेत. इतर कोणत्याही ऑफर्ससोबत ही ऑफर जोडू नये. ऑफर्समध्ये डिस्काउंट्ससुद्धा समाविष्ट आहेत. ऑफर फक्त साठा असेपर्यंत. प्रोसेसिंग फी बजाज फाईनान्स किंवा कॅपिटल फर्स्टप्रमाणे लागू. ऑफर फक्त बजाज फायनान्स लिमिटेड किंवा कॅपिटल फर्स्ट लिमीटेडच्या अखत्यारित आहे. कृपया आपले क्रेडिट कार्ड, चेक, 1 फोटो, रेसिडेन्शीयल प्रूफ, फोटो आयडी सोबत आणावे. #निवडक मॉडेल्सवर लागू. *एसबीआय क्रेडिट कार्ड ऑफर ऑगस्ट 14 - ऑगस्ट 18, 2017 पर्यंत वैध. किमान ₹ 20,000 च्या व्यवहारावर लागू. कमाल कॅशबॅक प्रति कार्ड अकाउंट ₹ 2,000. अधिक माहितीसाठी sbicard.com वर लॉग ऑन करा. 5% कॅशबॅक फक्त निवडक ब्रँड्स आणि मॉडेल्सवर लागू.
NETWORK VS1184-17 Mum Mar